महाराष्ट्र शासन

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२५/प्र.क्र.१४/जाहीर सूचना-११/केप्रप्र/२०२५/२६१५ दिनांक -०६.०८.२०२५.

## केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) फेरीच्या अर्जाबाबत उमेदवार/ संस्थांना महत्वाची सूचना

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता तंत्रशिक्षण विभागांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्याकरिता महत्वाच्या सूचना पुढीलप्रमाणे -

माहिती पुस्तिकेतील नियम ९ मधील तरतुदीनुसार, उमेदवार त्यांच्या पसंतीच्या उतरत्या क्रमाने संस्था आणि अभ्यासक्रमांची पसंती भरू शकतात. उमेदवाराने त्यांच्या लॉगिनद्वारे अर्ज सादर केल्यानंतर पर्याय अर्ज संबंधित केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेरींमध्ये वाटपासाठी विचारात घेतला जाईल. उमेदवार त्यांच्या पसंतीच्या उतरत्या क्रमाने संस्था आणि अभ्यासक्रमांच्या जास्तीत जास्त ३०० पर्याय भरू शकतात.

### केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया फेरी-१

जर एखाद्या उमेदवाराला त्याच्या पहिल्या पसंतीनुसार जागा वाटप केली गेली, तर असे वाटप आपोआप गोठवले (Autofreez) जाईल आणि उमेदवारास दिलेलेल्या मुदतीमध्ये प्रवेश घ्यावा लागेल. असा उमेदवार पुढील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र राहणार नाही.

### केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया फेरी-२

जर एखाद्या उमेदवाराला दुसऱ्या फेरीत त्याच्या पहिल्या तीन पसंतींनुसार जागा वाटप केली गेली, तर असे जागा वाटप आपोआप गोठवले (Autofreez) जाईल आणि उमेदवारास दिलेल्या मुदतीमध्ये प्रवेश घ्यावा लागेल. असा उमेदवार पुढील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र राहणार नाही.

### केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया फेरी-३

जर एखाद्या उमेदवाराला तिसऱ्या फेरीत त्याच्या पहिल्या सहा पसंतींनुसार जागा वाटप केली गेली, तर असे जागा वाटप आपोआप गोठवले (Autofreez) जाईल आणि उमेदवारास दिलेल्या मुदतीमध्ये प्रवेश घ्यावा लागेल. असा उमेदवार पुढील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र राहणार नाही.

**केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया फेरी-४**

चौथी फेरीमध्ये सहभागी उमेदवारांसाठी चौथी फेरीमध्ये केलेले वाटप अंतिम असेल.चौथी फेरीनंतर उमेदवाराला आणखी कोणताही सुधारणा पर्याय उपलब्ध राहणार नाही.

वरील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेरी निहाय पर्याय अर्ज भरताना सदरील नियमांची दखल उमेदवार/ पालक आणि संस्था यांनी घ्यावी.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई